# पहिली खबर
# FIRST INFORMATION REPORT

भारतीय नागरिक सुरक्षा संहिता - २०२३ च्या कलम १७३ अंतर्गत (Under Section 173 B.N.S.S.-2023)

1. राज्य State: महाराष्ट्र  जिल्हा District: मुंबई  पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि. मुं.  पहिली खबर क्र. FIR No.: १८  वर्ष Year: २०२५  दिनांक Date: १३/०५/२०२५

2. (i) अधिनियम Act: भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८  कलमे Sections: ७
   (ii) अधिनियम Act: —  कलमे Sections: —
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections: —

3. (a) अपराधाची घटना : Occurrence of offence : वार Day: मंगळवार  तारीख पासून Date from: १३/५/२५  वेळ Time: १४:१३  तारीख पर्यंत Date to: १३/५/२५  वेळ Time: २०:३०

वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा (Tick applicable portion).

(1) ००.०० ते ०३.०० (2) ०३.०० ते ०६.०० (3) ०६.०० ते ०९.०० (4) ०९.०० ते १२.०० (5) १२.०० ते १५.००
(6) १५.०० ते १८.०० (7) १८.०० ते २१.०० (8) २१.०० ते २४.००

(b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S.  तारीख Date: १३/०५/२०२५  वेळ Time: २०:३०

(c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No.: ०१/२५  तारीख Date: १४/०५/२०२५  वेळ Time: ०५:३०

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी  लेखी / तोंडी Written / Oral

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ……  चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O. P. Name and No. ……

(b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: व.पो.नि. शिवाजीनगर पो. ठाणे, मुंबई यांचे केबिन, शिवाजीनगर पो. ठाणे इमारत, १ला माळा, शिवाजीनगर, गोवंडी, मुंबई ४३.
ठिकाणाचे नंबर No., if any …… मुहल्ला Ward …… रस्त्याचे नाव Name of road ……

जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place ……  गाव Village ……  पोस्ट Post ……  तालुका Taluka ……  जिल्हा Dist. ……  राज्य State ……

(c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station: —  तालुका Taluka: —  जिल्हा Dist.: —  राज्य State: —

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.

(a) नाव Name: श्री. मोहम्मद शाकीर अन्सारी
(b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: अब्दुल मन्नान
(c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: ४१ वर्षे
(d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय  फोन नं. Phone No.: ९१३७०३५२२४
(e) पारपत्र क्रमांक Passport No.: —  दिल्याचा दिनांक Date of issue: —  दिल्याचे ठिकाण Place of Issue: —
(f) व्यवसाय Occupation: कारपेंटर
(g) धर्म Religion: मुस्लिम  जात Caste: —  जनजात Sub-Caste: —
(h) पत्ता Address: कमला रमन नगर, फरहानिया चौक, बैंगनवाडी, गोवंडी, मुं. ४३
Ward …… House Name No. …… फोन नं. Phone No. …… Pan No. …… वोटर्स नं. Card No. ……

रस्त्याचे नाव Road ……  जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ……  गाव Village ……  पोस्ट Post ……  पो. स्टे. P. Stn. ……

तालुका Taluka ……  जिल्हा Dist. ……  राज्य State ……  सध्याचा पत्ता Present Address ……

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता ( आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा. ) ( संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे. )

Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)

बापूराव मधुकर देशमुख / ५० वर्षे, वपोनि. शिवाजीनगर पो. ठाणे, मुंबई, राहणार - मोराज रेसीडेंसी, बिल्डींग नं F-3, रु. नं. 202, सेक्टर-१६, सानपाडा, नवीमुंबई - ४००७०५.

(G.C.P.) K 1043 (A) (1000–1-2025)

Scanned with OKEN Scanner

फिर्यादी -श्री मोहंमद झाकिर अब्दुल मन्नान अन्सारी / ४१ वर्षे, राहणार बैंगनवाडी, गोवंडी, मुंबई-४३, यांचा स्वतंत्र पानावर नोंदविण्यात आलेला जबाब हीच सदर गुन्ह्याची प्रथम खबर म्हणून संबोधण्यात येत आहे

समक्ष

(यशवंत बोरसे)
पोलीस निरीक्षक
त्याप्रवि. मुंबई.

फिर्याद दिनांक – १४/०५/२०२५.

श्री. मोहम्मद जाकिर अब्दुल मन्नान अन्सारी, वय ४१ वर्षे, नोकरी – संयुक्त सचिव, मदरसा इसलामिया बेहरूल उलुम एण्ड हिंदी स्कुल ट्रस्ट, रा. ठि. कमला रामन नगर, फरकानिया चौक, बैगंनवाडी, गोवंडी, मुंबई ४०००३७ मो. नं ९१३७३५२८२४

---

मी वरीलप्रमाणे असून वर नमुद पत्त्यावर माझे कुटुंबियासमवेत माझ्या जन्मापासुन रहावयास आहे. माझा बेंगणवाडी, गोवंडी मुंबई येथे गारमेंन्टचा व्यवसाय असुन त्यावर माझे व माझ्या कुटूंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी मदरसा इस्लामिया बहरूल उलुम एंण्ड हिंदी स्कुल ट्रस्ट मध्ये संयुक्त सचिव म्हणुन काम करतो. सदर ट्रस्ट चा रजिष्टर क्र. 609/80 G.B.B.S.D. P.T.R. No. F-6442(Mumbai) असा आहे. इसम नामे मकबुल नुरूल हसन अन्सारी व त्याचे साथीदार यांनी दि. २५/०८/२०२४ रोजी मी ट्रस्टी असलेल्या मदरसा इस्लामिया बहरूल उलुम एण्ड हिंदी स्कुल या शाळेच्या ऑफिसचे कुलुप तोडुन जबरदस्तीने आतमध्ये प्रवेश करून संस्थेवर कब्जा करण्याचा प्रयत्न केला होता. त्याबाबत मी ट्रस्टच्या वतीने त्यांच्या वर गुन्हा नोंदविणे बाबत शिवाजी नगर पोलीस ठाणेस तक्रारी अर्ज दिला होता. सदर तक्रार अर्जाची चौकशी पो.नि.श्री. प्रविण पाटील यांच्याकडे चालु होती. मात्र त्यांनी सदर तक्रार अर्जावर काहीही कार्यवाही न केल्याने मी ट्रस्टच्या वतीने मा. उच्च न्यायालय मंबई येथे क्र १८८३७/२०२४ (STAMP) अन्वये रिट पीटीशन दाखल केली होती. सदर प्रकरणी दि. १८/०२/२०२५ रोजी मा. उच्च न्यायालयाने सदर अर्जाची पोलीस ठाणेकडुन चौकशी होवुन अर्जदारास कळविण्याबाबत आदेशित केले होते.

तसेच इसम नामे मकबुल नुरूल हसन अन्सारी व त्याचे साथीदार यांनी मदरसा इस्लामिया बहरूल उलुम एण्ड हिंदी स्कुल ट्रस्ट या नावाने बनावट लेटर हेड तसेच शिक्का तयार करून बनावट पावती पुस्तक तयार करून त्यांच्या माध्यमातुन सामान्य जनतेकडुन देणगी मिळवली व त्याचा उपयोग स्वतःच्या वैयक्तीक फायदयासाठी खर्च करून ट्रस्ट चे आर्थिक नुकसान केल्याने मी त्याबाबत देखील तक्रार अर्ज दि. १२/०३/२०२५ रोजी शिवाजी नगर पोलीस ठाणेस तसेच समांतर अर्ज मा. धर्मादाय उप आयुक्त, बृहन्मुंबई विभाग, वरळी, मुंबई यांच्याकडे ट्रस्टचे वतीने केला होता.

उपरोक्त दोन्ही तक्रार अर्जाच्या अनुषंगाने मी दि. २२/०४/२०२५ रोजी शिवाजी नगर पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. बापुराव देशमुख यांची त्यांचे दालनात भेट घेवुन माझे तक्रार अर्जावर काय कारवाई केली? याबाबत माहिती घेतली असता सदर प्रकरणात मा. धर्मादाय उप आयुक्त, वरळी, मुंबई यांच्या कार्यालयात ट्रस्ट संबंधी चालु असलेल्या सुनावणी बाबत अंतिम निर्णय येईपर्यत इसम नामे मकबुल नुरूल हसन अन्सारी व त्याचे साथीदार यांना उपरोक्त शाळेच्या परिसरात प्रवेश करू न देण्यासाठी तसेच सदर प्रकरणी पोलीस संरक्षण देण्यासाठी माझ्याकडे रू. पाच लाख लाचेची मागणी केली. मात्र उपरोक्त रक्कम देण्यास मी असमर्थता दर्शविल्याने किमान रू ३,००,०००/– एवढी रक्कम लाच म्हणुन द्यावी लागेल असे वपोनि श्री. बापुराव देशमुख यांनी मला सांगितले. त्यावर मी इतर ट्रस्टींसोबत चर्चा करुन येतो असे त्यांना सांगितले होते.

माझी वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. बापुराव देशमुख यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि. १३/०५/२०२५ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, वरळी, मुंबई येथे लेखी तक्रार दिली.

मी दिलेल्या तक्रारीप्रमाणे त्याच दिवशी वपोनि श्री. बापुराव देशमुख, यांचेविरुध्द पडताळणी कारवाई करीता लाप्रवि कार्यालयात हजर होतो. सदरवेळी सपोआ श्री. शिरसाठ यांनी पडताळणी कारवाईसाठी हजर असलेले पो.नि. यशवंत बोरसे तसेच पंच श्री. पारवे व श्री. नेटके यांची ओळख करुन दिली.

Scanned with OKEN Scanner

त्यानंतर दोन्ही पंचाना पो.नि. यशवंत बोरसे यांनी मी स्वत: टाईप करून आणलेला
तक्रार अर्ज दाखविला त्यावर दोन्ही पंच व दोन्ही पोलीस अधिकारी यांनी समक्ष म्हणुन सहया
केल्या व त्याची एक प्रत मला पोहोच म्हणुन दिली व सदरचा अर्ज पो.नि. बोरसे यांनी
पुढील कारवाईकरिता स्वत:कडे ठेवुन घेतला. त्यानंतर बोरसे हे मला व पंचांना गोपनीय
कक्षात घेवुन गेले तेथे टेक्नीशीयन पो.ह. यादव यांनी माझे, पो.नि. बोरसे व दोन पंच यांचे
वक्तव्य एका व्हॉइस रेकॉर्डर मध्ये ध्वनीमुद्रीत केले.

त्यानंतर पो.नि. बोरसे, एसीपी शिरसाठ, दोन सरकारी पंच तसेच सापळा कारवाईत
सहभाग घेणारे पोलीस अंमलदार यादव असे पथक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालयाचे
दोन शासकिय वाहनात बसुन कलानगर जंक्शन सर्व्हिस रोड, बांद्रा पुर्व, मुंबई येथे थांबले
असता मी एसीपी. सिरसाठ यांनी सुचित केल्यानुसार शिवाजीनगर पोलीस ठाणेचे वपोनि श्री.
बापुराव देशमुख यांचे मोबाईल नंबर वर व्हाट्सअॅप कॉल करुन भेट घेण्याबाबत विचारणा
केली असता त्यांनी भेटीची तयारी दर्शविल्याने आम्ही शासकिय वाहनासह छेडा नगर
जंक्शन, मानखुर्द लिंक रोड, घाटकोपर पूर्व या ठिकाणी पोहचलो.

त्यानंतर पो.नि. बोरसे यांच्या आदेशाने मी व पंच क्र. ०१ श्री. पारवे आलोसे यांच्या
कार्यालयात जाण्याकरीता माझ्याकडे असलेल्या मोटर सायकलने निघालो तत्पूर्वी पो.नि. बोरसे
यांनी त्यांचेकडील व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन माझे शर्टचे आतील बाजूस बनीयनला सेप्टी
पिनच्या सहाय्याने लावला. 'मी शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे जावुन वपोनि श्री. देशमुख
यांची त्यांचे दालनात भेट घेतली. सदरवेळी पंच पारवे हे केबिन बाहेर थांबले होते. मी
वपोनि. देशमुख यांचेशी माझे कामाबाबत चर्चा केली असता त्यांनी '' **ठिक है मै अभी लेटर
बनवाके हाथसे दे देता हू... रिसिव करो और बस... और जो बोला है उसको उनमे से उसको
लिए ए करता हू और मॅटर क्लोज करेंगे.....उसमेंसे मै देता हू ना कोई टेन्शन नही... कितना
तीन बोले थे ना... कितना करेंगे... और एक कर बस...एक सव्वा करो बाद में एक सव्वा
करो... असे बोलून माझेकडे लाचेची मागणी केली.** त्यानंतर मी त्यांना सायंकाळी ०६:०० वा
पर्यत पैश्यांची व्यवस्था करतो असे सांगुन पंचासह पडताळणी पथकाकडे निघुन आलो. तेथे
पो.नि बोरसे यांनी माझ्याकडील व्हॉईस रेकॉर्डर बंद करून त्यांचे जवळ घेतला.

त्यानंतर एसीपी शिरसाठ यांनी मला व पंचाना तेथे काय झाले असे विचारले व
त्यानंतर पो.नि बोरसे व एसीपी शिरसाठ यांनी व्हाईस रेकॉर्डर मधील संभाषण ऐकुन
लोकसेवकाने रू २,५०,०००/—ची लाचेची मागणी करून त्याचा पहिला हफ्ता रू
१,२५,०००/—लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने पोनि बोरसे यांनी मला, पोलीस पथक
व दोन पंचाना सापळा कारवाईची माहिती समजावुन सांगितली व मला लाच रक्कमेबाबत
विचारणा केली असता मी माझ्या जवळील बचतीतुन आणलेली रक्कम रू १,००,०००/—
भारतीय चलनाच्या रू ५००/— दराच्या एकुण २०० नोटा पो.नि. बोरसे यांचेकडे सुपुर्द
केल्या. पोनि बोरसे यांनी नोटांच्या क्रमांकाचे मोबाईल द्वारे फोटो काढून घेतले.

त्यानंतर पो.नि. बोरसे यांनी वाहन चालक श्री. भोसले यांना बोलावून घेवून त्यांना
तक्रारदार व पंचांना अॅन्थ्रासीन पावडरचे गुणधर्म समजावून सांगण्यास सांगितल्याप्रमाणे वाहन
चालक श्री. भोसले यांनी मला व दोन पंचांना अॅन्थ्रासिन पावडरचे गुणधर्म सागितले व
त्यानंतर श्री. भोसले यांनी पोनि. बोरसे यांचे सुचनेनुसार नोटांना अॅन्थ्रासिन पावडर लावून
सदर नोटा माझ्या पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवली. तसेच श्री भोसले हे सापळा
कारवाईत सहभाग घेणार नसल्याचे पोनि. बोरसे यांनी मला व पंचांना सांगितले.

सदर ठिकाणी पो.नि. बोरसे यांनी पडताळणी पथकास सापळा कारवाईच्या अनुषंगाने
योग्य त्या सुचना दिल्या. तसेच लोकसेवक यांनी लाचेची रक्कम स्विकारल्यास, पो.नि. बोरसे

समक्ष

( यशवंत बोरसे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबइ

( मोहम्मद जाकिर अब्दुल मन्नान अंसारी )

यांना मोबाईलद्वारे व्हॉटस्अप मेसेजच्या माध्यमातून अंगठयाचा थंब दाखवून लाच स्विकारल्याबाबत इशारा करावा असे मला सांगण्यात आले. त्यानंतर पो.नि. बोरसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर मी परिधान केलेल्या शर्टच्या आतील बनियनला अडकवून, कोणास दिसणार नाही अशा रितीने रेकॉर्डर चालु करून तो चालु असल्याची खात्री करून ठेवून दिला.

त्यानंतर मी व पंच क्र १ पारवे असे लोकसेवक यांचे कार्यालयात जाण्यासाठी रवाना झालो. मी शिवाजी नगर पोलीस ठाण्याचे पहिल्या मजलयावरील वपोनि यांच्या दालनात गेलो. पंच पारवे हे वपोनि यांच्या दालनाच्या बाहेर थांबले होते. त्यावेळी मी '' एक हो गया है... सव्वा नही हुवा है... दस पधंरा हजार खर्चे के लिए...'' असे लोकसेवक देशमुख यांना बोलुन मी माझ्या पॅन्टच्या पुढील डाव्या खिशात ठेवलेली अॅन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १,००,०००/— काढून लोकसेवक बापुराव देशमुख यांच्यासमोर धरली त्यावर लोकसेवक देशमुख हे '' **ठिक है, चल जाने दो कोई टेन्शन नही है... और तुम्हारा लेटर भी बनाके रखखा है.....**'' असे बोलून लोकसेवक देशमुख यांनी ती अॅन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम रू. १,००,०००/— त्यांच्या उजव्या हाताने स्विकारून त्यांच्या टेबलाच्या उजव्या बाजुच्या वरच्या ड्रावर मध्ये ठेवली. मी लगेच माझ्या मोबाईलवरून पो.नि बोरसे यांच्या मोबाईलवर लोकसेवक देशमुख यांनी लाच स्विकारल्याबाबतचा पुर्वनियोजित इशारा केला. त्यावेळी आजुबाजूस दबा धरून बसलेल्या सापळा पथकाने लोकसेवक देशमुख यांचे दालनामध्ये येवून त्यांना लागलीच ताब्यात घेतले.

तरी लोकसेवक वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. बापुराव मधुकर देशमुख, वय ५७ वर्षे यांनी मी दिलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने मा धर्मादाय आयुक्त, मुंबई यांचा अंतिम आदेश येई पर्यत ट्रस्टच्या शाळेच्या परिसरात मध्ये विरोधकांना प्रवेश करू न देण्यासाठी तसेच पोलीस संरक्षण देण्यासाठी माझ्याकडे रुपये २,५०,०००/—इतक्या लाचेची मागणी केली. व त्याचा पहिला हफ्ता रू १,००,०००/— लाचेची रक्कम माझेकडून स्विकारली म्हणून माझी त्यांचे विरूध्द कायदेशीर तक्रार आहे.

माझे लोकसेवक श्री. बापुराव मधुकर देशमुख, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, शिवाजी नगर पोलीस ठाणे, मुंबई यांचेशी कोणतेही पुर्ववैमनस्य अथवा आर्थिक देवाणघेवाणीचे व्यवहार नाहीत.

माझी वरील फिर्याद संगणकावर मराठीत टंकलिखीत केली असून ती मला हिंदीतुन समजावुन सांगितली असुन ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

समक्ष,

( यशवंत बोरसे ),
पोलीस निरीक्षक,
लाचलूचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

( मोहम्मद जाकिर अब्दुल मन्नान अंसारी )

Scanned with OKEN Scanner

तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ........ तात्काळ

Reasons for delay in reporting by the complainant/informant

चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.

Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

(a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ........ लाचेची रक्कम रु १,००,०००/-

Total Value of properties stolen / involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties) रु १,००,०००/-

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ........ —

Unnatural / Accidental Death Case No., if any.

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.

First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

यातील फि" हे एका ट्रस्टचे ट्रस्टी असून, सदर ट्रस्टच्या शाळेच्या परिसरात दि. २५/०८/२४ रोजी काही इसमांनी सदर शाळेच्या गेटचे कुलूप तोडून जबरदस्तीने प्रवेश केला होता. तसेच सदर इसमांनी फि" ट्रस्टी असलेल्या ट्रस्टच्या नावे बनावट कागदपत्रे बनविली होती. सदरबाबत फि"नी शिवाजीनगर पो. ठाणे, मुंबई तसेच धर्मादाय आयुक्त, बृहन्मुंबई यांचेकडे तक्रारअर्ज दिला होता. त्या अनुषंगाने फि"ना मदत करण्यासाठी तसेच धर्मादाय आयुक्त, बृहन्मुंबई यांचे अंतिम आदेश येईपर्यंत ट्रस्टच्या परिसरात विरोधकांना प्रवेश करु न देण्यासाठी तसेच पोलीस संरक्षण देण्यासाठी लोकसेवक यांनी फि"कडे तीन लाख रु ची लाचेची मागणी केली. फि"ना लोकसेवकास लाच देण्याची

13. **केलेली कार्यवाही** -1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या (कृ.मा.पहावे.) तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा : श्री यशवंत बोरसे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. मुंबई.

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण, ........ —

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ........ — जिल्हा ........ — राज्य ........ —

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O) .............. Rank ............. No. ............ to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to ........................................

(3) Transferred to P. S. ..................................
District ................................... on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.
(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression of the Complainant/Informant
[signature]

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer In-charge, Police Station
[signature]

संपूर्ण नाव Name ...... यशवंत बोरसे

पदनाम Rank ...... पोलीस निरीक्षक

तपासिक अ. चा कोड क्र. ...... ला.प्र.वि. मुंबई.
Posting

Code No. of I. O. ........................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख ........ २४/०४/२०२४........
1. Date and time of submitted to the Court.

प्रत फिर्यादी,
Copy to 2. Complainant,

3. पोलीस अधीक्षक (संगणक),
3. Supdt. of Police (Computer),

4. तपासिक अंमलदार,
4. Inv. Officer,

5. स्थळ प्रत.
5. Office Copy.

Attachment to item 7 of First Information Report

Scanned with OKEN Scanner

इन्का नमखाने यांनी ला.प्र.वि. मुंबई कार्यालयास दि. १३/०५/२०२५ रोजी केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष केलेल्या पडताळणी कारवाईमध्ये लोकसेवक बापूराव देशमुख, व.पो.नि. शिवाजीनगर पोलीस ठाणे, मुंबई यांनी फि कडे तीन लाख रु.ची लाचेची मागणी करून तडजोडीअंती २,५०,०००/- रु स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने लागलीच पंचासमक्ष केलेल्या सापळा कारवाईमध्ये फि' यांचेकडून लाचेच्या रकमेचा पहिला हप्ता म्हणून रु १,००,०००/- लाचेची रक्कम स्विकारताना लोकसेवक यास रंगेहाथ पकडण्यात आले म्हणून लोकसेवक यांचेविरुद्ध कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद.

समक्ष

(यशवंत बोरसे)
पोलीस निरीक्षक,
ला.प्र.वि. मुंबई